॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

| Phone: (02462) 215556<br>Mobil.No: 8788218638<br>9403250206 | OFFICE OF THE DIRECTOR<br>SPORTS & PHYSICAL EDUCATION | website: srtmun.ac.in<br>E-mail : sports@srtmun.ac.in |
|---|---|---|


संदर्भ : क्रीडा/२०२६–२७/२७६ दिनांक : १६/०९/२०२६

प्रति,

<u>तातडीचे/महत्वाचे</u>

**मा. प्राचार्य,**

सर्व संलग्नित महाविद्यालये,

प्रस्तुत विद्यापीठ

**विषय :** 'भारत स्पोर्ट्स' पोर्टलवर महाविद्यालय व खेळाडूंची नोंदणी करणे बाबत...

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्रीडा/२०२५–२६/८५०, दिनांक ०२/०२/२०२६

२. या कार्यालयाचे पत्र क्रीडा/२०२५–२६/८६३, दिनांक ०९/०२/२०२६

३. या कार्यालयाचे पत्र क्रीडा/२०२५–२६/२०१, दिनांक १८/०८/२०२६

४. या कार्यालयाचे पत्र क्रीडा/२०२५–२६/२०५, दिनांक १८/०८/२०२६

**महोदय,**

वरील विषयास व संदर्भिय पत्र ०१ ते ०४ अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, 'भारत स्पोर्टस्' या पोर्टलवर आपल्या विभागांतर्गत महाविद्यालय व महाविद्यालयातील खेळाडू त्यांच्या नाव नोंदणी करणे आवश्यक आहे, ज्या योगे अश्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतर राष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी सुनियोजित प्रकारे प्रशिक्षण उपलब्ध करुन देता येवू शकेल हा या उद्देशाने सदरील पोर्टलची निर्मिती करण्यात आलेली आहे. सर्व महाविद्यालयांना वरील संदर्भिय पत्रान्वये यापूर्वी नोंदणी करुन घेण्याबाबत कळविण्यात आलेले होते परंतू ब–याच महाविद्यालयांनी अद्याप पर्यंत पोर्टलवर नोंदणी केलेली नाही.

**दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी मा. अवर सचिव, मा. राज्यपाल महोदय यांचे कार्यालय यांनी ऑनलाईन बैठकीत प्रस्तुत विद्यापीठ परिक्षेत्रातील ब–याच महाविद्यालयांनी नोंदणी केले नसल्याचे सांगून तिव्र नाराजी व्यक्त केली असून नोंदणी न करणा–या महाविद्यालयांवर योग्य कार्यवाही करण्याबाबत मा. कुलगुरु महोदय यांच्या बैठकीत निर्देश देण्यात येईल असे कळविले आहे.**

तरी याद्वारे सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाची व खेळाडूंची नोंदणी भारत पोर्टलवर त्वरीत करुन आपला अहवाल दिनांक २५/०९/२०२६ पर्यन्त क्रीडा विभागाच्या **E-mail : <u>sports@srtmun.ac.in</u>** यावर पाठविण्यात यावा, जे महाविद्यालये मुद्दतीच्या आत नोंदणी करणार नाही, त्या महाविद्यालयाची,

०१.क्रीडा शुल्क स्विकारण्यात येणार नाही,

०२.संबंधित महाविद्यालयाचे खेळाडूंना विभागीय, आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

०३.संबंधित महाविद्यालयाचे पात्रता, संलग्निकरण प्रस्ताव स्विकारले जाणार नाही.

२....

तसेच ज्या महाविद्यालयात विभागीय, आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा झालेल्या आहेत व होणार आहेत, त्या महाविद्यालयांनी भारत पोर्टलच्या महाविद्यलयांच्या लॉगीगने स्पर्धेचा अहवाल, स्पर्धेचे फोटो (स्पर्धेच्या उद्‌घाटन, बक्षिस समारंभ व क्रीडा स्पर्धेचे) स्पर्धा संपल्या त्याच दिवशी अपलोड करणे अनिवार्य आहे.

तरी सर्व संबंधित महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी, ही विनंती.

डॉ. भास्कर माने

:                                                    प्र. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण

*'भारत स्पोर्टस्' पोर्टल* वेबसाईट : **bharatsports.org**

*महाविद्यालय नोंदणी लिंक :* **https://bharatsports.org/register/college**

*विद्यार्थी/खेळाडू नोंदणी लिंक :* **https://bharatsports.org/register/player**

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव

०१. मा. विभागीय अध्यक्ष, अ,ब,क व ड विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

०२. संचालक, शारीरिक शिक्षणा व क्रीडा, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीस्तव :

०१. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

०२. उपकुलसचिव, संलग्निकरण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

०३. उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

०४. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.